# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ५४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.१९ ऑक्टोबर, २०१३ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ५४ वी बैठक शनिवार, दि.१९ ऑक्टोबर, २०१३ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग | सदस्या |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ६) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १०) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| ११) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १२) | श्री. रोकडे एम. एस. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १३) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थितीः**

प्रा. डॉ. पाटील टी. आर. यांनी पत्राद्वारे व सौ. पद्मजादेवी मोहिते-पाटील यांनी दूरध्वनीद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची बैठकीत नोंद घेण्यात आली.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.३१ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या ५३ व्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.३१ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या ५३ व्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची बैठकीत नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठरावः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] B.Com.(Hons.) या पदवीस्तरावरील परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास " The Institute of Chartered Accounts of India Gold Medal " देणेकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: (टिपणी - दि. १५/४/२०१३ रोजीच्या पत्रान्वये श्री. विजय कपूर, संचालक, इन्स्टिटयूट ऑफ चार्टड अकांऊट ऑफ इंडिया, यूपी यांचेकडून देणगी रक्कम रु.१,००,०००/- विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. त्यानुसार व्यस्थापन परिषदेच्या बैठकीत सुवर्णपदकांच्या यादीमध्ये समाविष्ठ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी सदर देणगीच्या व्याजातून B.Com.(Hons.) या पदवीस्तरावरील परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "The Institute of Chartered Accounts of India Gold Medal" या नावाने पुरस्कार देण्याकरीता नियमावलीचा मसुदा (१) डॉ. लोणीकर एस. व्ही. (२) डॉ. सलगर बी. एस. या समितीने तयार करुन दिलेला आहे.

सबब, शै. वर्ष २०१४-१५ पासून B.Com. (Hons.) या पदवीस्तरावरील परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "The Institute of Chartered Accounts of India Gold Medal " या नावाने पुरस्कार देण्याकरीता नियमावलीचा तयार करण्यात आलेला मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : B.Com.(Hons.) या पदवीस्तरावरील परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास " The Institute of Chartered Accounts of India Gold Medal " देणेकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीच्या मसुद्यास खालील दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली.**

***Eligibility***

**१) मुद्दा क्र. १ मधील तिसऱ्या ओळीमध्ये "the final year" ऐवजी "I$^{st}$, II$^{nd}$ & III$^{rd}$ year" अशी दुरुस्ती करावी.**

**२) मुद्दा क्र. ४ मधील तिसऱ्या ओळीमध्ये "Final year is eligible" ऐवजी "I$^{st}$, II$^{nd}$ & III$^{rd}$ year" अशी दुरुस्ती करावी तसेच याच मुद्दयातील पाचव्या ओळीमध्ये "Final year only"ऐवजी " I$^{st}$, II$^{nd}$ & III$^{rd}$ year" अशी दुरुस्ती करावी तसेच याच मुद्दयातील सहाव्या ओळीमध्ये "Final year" ऐवजी " I$^{st}$, II$^{nd}$ & III$^{rd}$ year " अशी दुरुस्ती करावी.**

**[ ०४ ] सोलापूर विद्यापीठामध्ये बी. ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयाच्या परिक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "डॉ.श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" देणेकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१०/६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये डॉ.श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर, सोलापूर यांचेकडून देणगी रक्कम रु.१,००,०००/- विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. त्यानुसार दि.२६/६/१३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.८ नुसार सुवर्णपदकांच्या यादीमध्ये समाविष्ठ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी सदर देणगीच्या व्याजातून बी. ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास " डॉ.श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक " या नावाने पुरस्कार देण्याकरीता नियमावलीचा मसुदा (१) डॉ. लोणीकर एस. व्ही. (२) डॉ. सलगर बी. एस. या समितीने तयार करुन दिलेला आहे.

सबब, शै. वर्ष २०१३ - १४ पासून बी. ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "डॉ. श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" या नावाने पुरस्कार देण्याकरीता नियमावलीचा तयार करण्यात आलेला मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : बी. ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयाच्या परिक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "डॉ.श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" वितरण नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ]** **बी. ए. भाग-१, २, ३ एकत्रित गुणासह भूगोल या पदवीस्तरावरील परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "प्राचार्य के. एम. जमादार सुवर्णपदक" देणेकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१६/८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये सोलापूर भूगोल शिक्षकसंघ, सोलापूर यांचेकडून देणगी रक्कम रु.१,००,०००/- विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. त्यानुसार दि.३१/९/१३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १४ नुसार सुवर्णपदकांच्या यादीमध्ये समाविष्ठ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी सदर देणगीच्या व्याजातून बी. ए. भाग-१, २, ३ एकत्रित गुणासह भूगोल या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास **"प्राचार्य के. एम. जमादार सुवर्णपदक"** या नावाने पुरस्कार देण्याकरीता नियमावलीचा मसुदा (१) डॉ. लोणीकर एस. व्ही. (२) डॉ. सलगर बी. एस. या समितीने तयार करुन दिलेला आहे.

सबब, शै. वर्ष २०१३ - १४ पासून बी. ए. भाग-१, २, ३ एकत्रित गुणासह भूगोल या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "प्राचार्य के. एम. जमादार सुवर्णपदक" या नावाने पुरस्कार देण्याकरीता नियमावलीचा तयार करण्यात आलेला मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)

**ठराव :** **बी. ए. भाग-१, २, ३ एकत्रित गुणासह भूगोल या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "प्राचार्य के. एम. जमादार सुवर्णपदक" वितरण नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (सीसी) नुसार, सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेस मान्यतेकरिता शिफारस करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १०३ नुसार, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता मे.संकपाळ कुलकर्णी ॲन्ड असोसिएटस्, कोल्हापूर यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मे.संकपाळ कुलकर्णी ॲन्ड असोसिएटस्, कोल्हापूर यांनी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे. या लेखापरीक्षण अहवालावरील आक्षेप व लेखापरीक्षण अहवाल अंतिम करण्यासाठी (Account Code 1.50 h) नुसार मा.कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची खालीलप्रमाणे उपसमिती गठीत केली.

| | |
|---|---|
| १) प्रा. एस. व्ही. लोणीकर | - अध्यक्ष |
| २) श्री. बी. आर. गायकवाड | - सदस्य |
| ३) डॉ. एन. बी. पवार | - सदस्य |
| ४) श्री. एम. एस. रोकडे | - सदस्य - सचिव |

या समितीने दि.११/०९/२०१३ रोजी बैठक घेतली. या बैठकीचा अहवाल दि.११/१०/२०१३ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय क्र. ०५ अन्वये माहितीसाठी व विचारार्थ सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव : विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५(२)(e) नुसार व लेखापरीक्षण अहवाल त्याच्या अनुपालन अहवालातील सुधारणांसह व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणेस शिफारस करण्यात आली.

सबब, वित्त व लेखा समितीने शिफारस केलेले सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (सीसी) नुसार व सोलापूर विद्यापीठ परिनियम क्र. ४७४ (६) अन्वये अधिसभेस शिफारस करण्याकरिता विचारार्थ).

**ठराव : सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाची वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात येवून अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[ ०७ ]** **सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या दि.१६/११/२०१३ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या सभेत सादर करण्यात येणार आहे.

सबब, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :** **सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी मा. श्री. बी. आर. गायकवाड, व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ०८ ] दि.११/१०/२०१३ रोजीच्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत (विषय क्र. ५ वगळून) मान्यतेस्तव.**

(टिपणी: (टिपणी: दि.११/१०/२०१३ रोजीच्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे त्यानुसार विषय क्र.१ ते ५ बाबत व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस केलेली आहे. तथापि, विषय क्र.५ हा सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणाचा असल्याने तो स्वतंत्र सादर करण्यात येत आहे.

**सबब, दि.११/१०/२०१३ रोजीच्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत (विषय क्र.५ वगळून) मान्यतेस्तव).**

**ठराव : दि.११/१०/२०१३ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या कार्यवृत्तांतास (विषय क्र. ५ स्वतंत्र विषय सादर असल्याने तो वगळून) मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] ग्रंथालय समितीच्या दि.२३/०९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: ग्रंथालय समितीची दि.२३/०९/२०१३ रोजी सभा झाली. विषय पत्रिकेवर पुस्तके व नियतकालिके खरेदी वार्षिक खर्च व वार्षिक अहवाल इ विषय विचारार्थ होते. ग्रंथालय समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (१) (ग) (३), (४) व (५) अन्वये मान्यता घेणे आवश्यक आहे. व्यवस्थापन समितीची सभा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत सदर कार्यवृत्तांतास मान्यता मिळणार नाही. त्यामुळे पुस्तक खरेदीस विलंब होईल. तरी सदरचे कार्यवृत्तांतास महाराष्ट्र विद्यापीठे १९९४ कायदा मधील कलम १४ (७) अन्वये ग्रंथालय समितीच्या दि.२३/०९/२०१३ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

मा.कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव सादर).

**ठराव : मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १० ] राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्ट, सोलापूर जिल्हा, सोलापूर यांच्याकडून सोलापूर जिल्हयातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यापीठामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास रु.२०००/- प्रमाणे मदत निधी देण्याबाबत मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्ट, यांचेकडुन दि. ०२/०३/२०१३ व दि.३०/०९/२०१३ रोजीच्या पत्रानुसार सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यापीठामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास रु.२०००/- प्रमाणे मदत निधी देण्याचे प्रयोजित केले असून त्यासोबत खालीलप्रमाणे चेक दिलेले आहे.

| **अ.क्र.** | **धनादेश क्र.** | **रक्कम** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|---|
| १ | ७७१२३४ | ७,५८०००/- | ३७९ |
| २ | ७७२८१४ | ८,०००/- | ०४ |
| ३ | ७७२८१० | ५४,०००/- | २७ |
| ४ | ७७२८११, ७७२८२८ | ३२,०००+४,०००/- | १६+२ |
| ५ | ७७२८१३ | २०,०००/- | १० |
| ६ | ७७२८१२ | १,१८,०००/- | ५९ |
| ७ | ७७२८०७ | ३६,०००/- | १८ |
| ८ | ७७२८१५ | २०,०००/- | १० |
| **एकुण** | **१०५००००/-** | **५२५** | |

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या रक्कमेनुसार एकूण ५२५ पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यापीठ अधिविभागातील विद्यार्थ्यांस रु.२०००/- प्रमाणे धनादेश वाटप करण्यास मा. कुलगुरुमहोदयांनी म. वि. का. १९९४ कलम २८ (h) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिली.

**सबब, मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव)**

**ठराव : मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**<u>मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:</u>**

**[ ११(१)]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ कलम २० (१) (बी) अन्वये, वित्त व लेखा अधिकारी हे संवैधानिक पद नामनिर्देशनाद्वारे पदभरती प्रक्रिया करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम २० (१) (बी) नुसार, वित्त व लेखा अधिकारी यांची निवड व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशनाद्वारे अथवा भारत सरकार अथवा महाराष्ट्र शासनाकडून योग्य उमेदवारास प्रतिनियुक्तीवर घेवून करता येते.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ७९ (१) (ए) अन्वये, गठित केलेल्या वित्त व लेखा अधिकारी या पदासाठी निवड समितीने डॉ. डी. डी. पुजारी यांची केलेली शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या दि.२४/१२/२००८ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्र.७ अन्वये मान्य करण्यात आली होती. त्यानुसार, डॉ. डी. डी. पुजारी यांची वित्त व लेखा अधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली होती. डॉ. डी. डी. पुजारी दि.०१/०१/२००९ रोजी वित्त व लेखा अधिकारी पदावर रुजू झाले. याअनुषंगाने, डॉ. पुजारी यांचा संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथील सहाय्यक प्राध्यापक या पदाचा धारणाधिकार संपुष्टात आल्याने त्यांनी दि.१४/०६/२०१३ रोजी वित्त व लेखा अधिकारी पदाचा राजीनामा स्वीकृत करुन त्यांना दि.१४/०६/२०१३ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. वित्त व लेखा अधिकारी या रिक्त पदाकरिता स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देण्यात आली होती. या जाहिरातीस अनुसरुन एकूण ०३ अर्ज विद्यापीठास प्राप्त झाले होते. हे तीनही अर्ज छाननीत अपात्र झाले.

विद्यापीठाचे पत्र जा.क्र. सोविसो/आस्था/२०१३-१४/२२८६, दि.२९/०६/२०१३ अन्वये, वित्त व लेखा अधिकारी या संवैधानिक अधिकाऱ्यास सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे प्रतिनियुक्तीवर पाठविण्याबाबत मा. श्री. राजेश अग्रवाल, सचिव, लेखा व कोषागार, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना कळविण्यात आले होते. या प्रस्तावावर शासनाकडून अद्यापही उत्तर अप्राप्त आहे.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ कलम २० (१) (बी) अन्वये, वित्त व लेखा अधिकारी हे संवैधानिक पद नामनिर्देशनाद्वारे पदभरती प्रक्रिया पुन्हा जाहिरात देवून सुरु करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ कलम २० (१) (बी) अन्वये, वित्त व लेखा अधिकारी हे संवैधानिक पद नामनिर्देशनाद्वारे पदभरती प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ११(२)] अंतर्गत लेखापरीक्षण कक्ष वित्त व लेखा विभागांतर्गत सुरु करणेची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येत की, महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता १ एप्रिल, २०१२ पासून काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत उच्च व तंत्र विभाग शासन निर्णय क्र. २००९ / (१६५ / ०९) / विशि-२ / मंत्रालय-मुंबई/दि.२७/१२/२०१२ अन्वये सर्व विद्यापीठांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेवून समान लेखा संहितेची अंमलबजावणी या विद्यापीठात केली आहे. सदर समान लेखा संहितेमधील तरतूद क्र.१.४९ नुसार वित्त व लेखा विभागांतर्गत अंतर्गत लेखापरीक्षण कक्ष असणे आवश्यक आहे. सदर कक्षाची कार्यकर्तव्येची माहिती ही समान लेखा संहितेतील तरतूद क्र.१.४९ (AToC) व १२-(३.१०५ ते ३.१११) मध्ये सविस्तर दिलेली आहे. या कक्षाचे मुख्य काम हे देयके पारित करण्यापूर्वी त्याची तपासणी समान लेखा संहिता व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयाच्या अनुषंगाने करुन त्यामधील काही त्रुटी असल्यास संबंधित विभागाला कळविणे व त्रुटीची पूर्तता झाल्यानंतर आदायगीसाठी सादर करणे इ. आहेत. या कक्षासाठी लागणाऱ्या कर्मचारी वर्गाची माहिती समान लेखा संहिता तरतूद Appendix IV (B) - Pattern Sr. No. १६ नुसार एक कक्ष अधिकारी व सहा (६) लिपीक अशी आहेत.

सदर कक्ष या विद्यापीठात अद्यापपर्यंत सुरु न केल्यामुळे महालेखाकार व संवैधानिक लेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षणामध्ये आक्षेप उपस्थित करण्यात आलेला आहे. सदरचा आक्षेप लेखापरीक्षणांच्या दृष्टीने गंभीर असल्यामुळे अंतर्गत लेखापरीक्षण कक्ष सुरु करणे आवश्यक आहे. तसेच १२ ब समितीने या विभागाच्या भेटी दरम्यान सदर कक्षाबाबत विचारणा केली होती. हा कक्ष समान लेखा संहितेत नमूद केलेल्या तरतूदीनुसार कामकाज पूर्ण करेल.

सध्या वित्त व लेखा विभागाकडे अपुरा कर्मचारीवर्ग असल्यामुळे अद्यापपर्यंत सदर कक्ष सुरु करण्यात आलेले नाही. सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षणाच्या अहवालामधील याबाबत नमूद केलेल्या आक्षेपावर दि.११/१०/२०१३ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये चर्चा होवून सदर विभाग चालू करण्यासंदर्भात सदस्यांनी सूचना दिलेल्या आहेत. सदर कक्ष सुरु केल्यानंतर लेखापरीक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपाची पूर्तता होणार आहे.

सदर विभाग सुरु करण्यासाठी समान लेखा संहिता १.४९ डी नुसार वित्त व लेखा समितीच्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे.

सबब, अंतर्गत लेखापरीक्षण कक्ष वित्त व लेखा विभागांतर्गत सुरु करणेची बाब विचारार्थ).

**ठराव: वित्त व लेखा विभागातंर्गत अंतर्गत लेखापरीक्षण कक्ष सुरु करण्यास व यासाठी अनुषंगिक कर्मचारी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[११(३)] सद्यस्थितीत विद्यापीठातील शैक्षणिक संकुल प्रणाली अंतर्गत कार्यरत अधिविभागांचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करुन अनुदानित होण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळण्याकरिता प्रस्ताव तयार करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः महाराष्ट्र शासनाचे दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या राजपत्रानुसार, सोलापूर विद्यापीठाची स्थापना होवून दि.१ ऑगस्ट, २००४ पासून कार्यान्वित झाले आहे. प्रस्तुत राजपत्रात शिवाजी विद्यापीठातंर्गत कार्यरत शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षण केंद्र सोलापूर येथे कार्यरत २१ शिक्षक व ४१ शिक्षकेतर कर्मचारी नव्याने निर्मित झालेल्या सोलापूर विद्यापीठास तीन अधिविभागासह(पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र व भूशास्त्र) हस्तांतरण झालेले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ मधील १२ ब नुसार विद्यापीठास मान्यता मिळण्याकरिता विद्यापीठात किमान पाच अनुदानित अधिविभाग असणे आवश्यक आहे. ही बाब विचारार्थ घेवून गणित व संख्याशास्त्र, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व शास्त्र असे दोन शैक्षणिक अधिविभाग सुरु करण्याच्या प्रस्ताव शासनास पाठविला होता. या अनुषंगाने, दि.०८/१०/२००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, या दोनही अधिविभागास १६ शिक्षकीय पदासह (गणित व संख्याशास्त्र अधिविभागास ९ व प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व शास्त्र अधिविभागास ७) अनुदान तत्त्वावर प्राप्त झाली आहे.

तद्नंतर विद्यापीठ प्रांगणात शैक्षणिक संकुल प्रणाली मान्यता शासन निर्णय क्र. एसयुएस/२००८/प्र.क्र.४४/०८/विशि-५, दि.२७ मार्च, २००८ अन्वये विद्यापीठाच्या मागणीनुसार मा.संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी सोलापूर विद्यापीठात शैक्षणिक संकुल प्रणाली सुरु करण्याच्या प्रस्तावाची शिफारस महाराष्ट्र शासनास दि.२३/०१/२००८ रोजीच्या पत्रान्वये केलेली होती. यास अनुसरुन तत्कालिन परिस्थितीत विद्यापीठात जे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु होते त्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विभागाचे नामाभिदान करुन शैक्षणिक संकुलप्रणाली सुरु करण्यास शासन कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार स्विकारणार नाही तसेच जे विभाग विनाअनुदानित आहेत त्यांना शासन कोणत्याही प्रकारचे अनुदान देणार नाही असे नमूद करुन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या अनुषंगाने, मा. संचालक (उ. शि.) पुणे यांनी दि.२५/४/२००८ रोजीच्या पत्रान्वये, पूर्वीच्या पाचही अनुदानित विभागातील शिक्षकांची पदे त्या त्या नवीन नामाभिदान करण्यात आलेल्या शैक्षणिक संकुलांना वर्ग करण्यास मंजूर पदाव्यतिरिक्त अधिक पदाचा आर्थिक भार शासनावर पडणार नाही या अटीस अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक संकुलप्रणाली ही शैक्षणिक वर्ष २००८ पासून कार्यान्वित

करण्यात आलेली आहे. सदर संकुलास १ प्राध्यापक, २ सहयोगी प्राध्यापक व ४ सहायक प्राध्यापक असा आकृतीबंध निश्चित केलेला आहे. शैक्षणिक संकुलप्रणालीस असा आकृतीबंध निश्चित असल्याने शैक्षणिक संकुलातंर्गत नव्याने प्रस्थापित केलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास आवश्यक ते शिक्षकीय पदे अनुदानित तत्त्वावर प्राप्त होत नाही. यास्तव शैक्षणिक संकुलाचे रुपांतर अधिविभागामध्ये झाल्यास प्रत्येक अधिविभागास १ प्राध्यापक, २ सहयोगी प्राध्यापक व ४ सहायक प्राध्यापक असे एकूण ७ पदे अनुदानित तत्त्वावर प्राप्त होवून अधिकची शिक्षकीय पदे विद्यापीठास उच्च शिक्षणांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी शासनाकडून प्राप्त होऊ शकतील आणि ते करुन घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत विद्यापीठातील शैक्षणिक संकुल प्रणाली अंतर्गत कार्यरत अधिविभागांचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करुन अनुदानित होण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळण्याकरिता प्रस्ताव तयार करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: सद्यस्थितीत विद्यापीठातील शैक्षणिक संकुल प्रणाली अंतर्गत कार्यरत अधिविभागांचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करुन अनुदानित होण्यासाठी शासनाकडून मान्यतेकरिता प्रस्ताव तयार करण्यासाठी प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर व डॉ. एस. एस. सूर्यवंशी या व्यवस्थापन परिषद सदस्यांसह इतर चार सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा.कुलगुरुमहोदयांना देण्यात आले.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**